महापालिका आयुक्त कार्यालय
अधिकार सुपूर्ति क्रमांक
मआ/ अधिकार सुपूर्ति/डीईएस/१४९०
दिनांक 22 MAY 2015

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा. क्र. म.आ./प्रक.ओ./९८२
दिनांक २२/५/१५

## :-अधिकार सुपूर्ती आज्ञापत्र:-

विषय:- घरबांधणी कर्ज या विभागाचे कामकाजाबाबत.

महानगरपालिकेतील सर्व संवर्गातील अधिकारी/सेवकांना घरबांधणी करिता काही अटी शर्तीवर अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार तसेच अग्रिमाची परतफेड पूर्ण झालेल्या सेवकांचा घरकर्जाचा बोजा उतरविणे (Deed Release) या बाबतचे अधिकार मा. महापालिका आयुक्त ठराव क्र.६/१७४ दि. ७/११/२०१४ ने मा. उपआयुक्त (जिं.घ.) यांना देण्यात आले होते. त्या अनुषंगाने वरिल नमूद सर्व कामकाज मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६९ (१) अन्वये अधिकार सुपूर्ति क्र. मआ/अधिकार सुपूर्ति /डीईएस/ डीईएस/१/१४८६/दि.७/११/२०१४ ने उपआयुक्त (जिं.घ.) यांना सुपूर्त करण्यात आले होते.

मे. शासनाने मंजूर केलेल्या आकृतिबंधामध्ये उपआयुक्त (जिं.घ.) कार्यालयाचा समावेश करण्यात आला नाही. त्यामुळे उपआयुक्त (जिं.घ.) कार्यालयाकडील घरबांधणी विभागाचे कामकाज मा. मुख्य कामगार अधिकारी यांचेकडे कार्यालयीन आदेश जा. क्र.७६३ दिनांक ११/०५/२०१५ अन्वये वर्ग करण्यात आले आहे. तरी यापुढे घरबांधणी अग्रिम मंजूर करणे तसेच घरबांधणीसाठी दिलेल्या अग्रिमाची परतफेड पूर्ण झालेल्या सेवकांचा बोजा उतरविणे (Deed Release) या बाबतचे अधिकार मा. मुख्य कामगार अधिकारी यांना सुपूर्त करण्यात येत आहे.

(कुणाल कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत :-
मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त(वि)
मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ)
पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहितीस्तव सादर . . . . .

प्रति:-
सर्व खातेप्रमुख
सर्व उपआयुक्त क्र १ ते ४
सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त
पुणे महानगरपालिका

यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी. . . . . .

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका
एमसी/डीईएल/१/१४८८
दिनांक :- 22 APR 2015

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. :- मआ/मुले/ ९२४
दिनांक :- २२/४/१५

-: अधिकार सुपूर्ति आज्ञापत्र :-

विषय :- अकस्मिक खर्चाकरिता मा.खातेप्रमुखांना अधिकार सुपूर्ति
संदर्भ :- मे.महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक मआख २०११/ प्र.क्र.१९/२०११/विनियम, दिनांक ०८ मे २०१४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ ब मधील तरतुद विचारात घेऊन सदरचे आज्ञापत्र प्रसृत करण्यात येत आहे.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार मे.राज्य शासनाकडील प्रशासनीक विभागाकडील खर्चाची मर्यादा र.रु. ५०००/- पर्यंत वाढविण्यात आली आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये खात्यांना अशा अकस्मिक खर्चाकरिता वेळोवेळी आवश्यक असणाऱ्या रकमांकरिता मा. महापालिका आयुक्त/मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेकरिता प्रस्ताव सादर करावे लागत असल्याने अशा प्रकरणांची संख्या अकारण वाढून कालापव्य होतो. त्यामुळे यापुढे र.रु. ५०००/- पर्यंतच्या अकस्मिक खर्चाकरित पुर्व अथवा पश्चात मान्यता देणेबाबतचे अधिकार सदर अधिकार सुपूर्ति आज्ञापत्राद्वारे सर्व मा.खातेप्रमुखांना सुपूर्त करण्यात येत आहेत.

वरील प्रमाणे सुपूर्त करण्यात आलेले अधिकार अंतर्गत अर्थान्वीक्षणाच्या तपासणीस आणि एकाच कारणाकरिता कामाचे विभाजन करून मान्यता न देण्याचे अटीस आधिन राहून वापरणे आवश्यक आहे. तसेच, याकरिता संबंधीत वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये पुरेशी तरतुद उपलब्ध असणे ही सुध्दा महत्वाची अट राहील. सदर अटींची पुर्तता होत नसल्यास सदर अधिकार सुपूर्ति आज्ञापत्राचा भंग ठरेल.

18-04-15

प्र. महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

महापालिका आयुक्त

अधिकार सुपूर्ती :- मआ/सुपूर्ती/DEL/१४८८

दिनांक :- २६/०३/२०१५

महापालिका आयुक्त कार्यालय

पुणे महानगरपालिका

जावक क्र. :-मआ/उआ/आस्था/७३५९

दिनांक :- २६/०३/२०१५

## अधिकार सुपूर्ती - आज्ञापत्र

विषय :- अधिकार सुपूर्ती - करारनाम्यावर स्वाक्षरी करणेबाबत.

संदर्भ :- मा.स्थायी समिती ठ.क्र. ४६ दि. १०/०४/२०१४

पुणे महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३ नुसार खरेदीखताचे(सेल डीड) व इतर दस्तावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार महापालिका आयुक्त यांना आहेत.

प्रशासकीय सोयीसाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६९(२) नुसार सदरचे अधिकार उपआयुक्त(मालमत्ता व्यवस्थापन) यांना प्रदान करण्यास मा.स्थायी समितीने संदर्भांकित ठ. क्र ४६ दि. १०/०४/२०१४ ने मंजुरी दिलेली आहे. सदर मंजुरीनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमचे कलम ७३ अन्वये खरेदीखताचे(सेल डीड) व इतर दस्तावर स्वाक्षरी करण्याचे मला असलेले अधिकार या आज्ञापत्राचे दिनांकापासून माझ्या अधिक्षण व नियंत्रणाच्या आधीन राहून उपआयुक्त (मालमत्ता व्यवस्थापन) यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६९(१) अन्वये सुपूर्त करण्यात येत आहेत.

या आज्ञापत्राचे दिनांकापासून उपआयुक्त(मालमत्ता व्यवस्थापन) यांनी वरीलप्रमाणे त्यांना सुपूर्त केलेल्या अधिकाराची अंमलबजावणी करावी.

महापालिका आयुक्त

पुणे महानगरपालिका

प्रतमाहितीसाठी :-

१. अतिरिक्त आयुक्त (इस्टेट)
२. अतिरिक्त आयुक्त (विशेष)
३. अतिरिक्त आयुक्त (जनरल)
४. मुख्यलेखापरीक्षक
५. मुख्य लेखा व वित्त अधिकारी

पुणे महानगरपालिका,

प्रति :- उपआयुक्त(मालमत्ता व्यवस्थापन)

पुणे महानगरपालिका

यांजकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी . . . .

उप आयुक्त (सामान्य प्रशासन)

पुणे महानगरपालिका

मुळ प्रत कार्यासोबत

महापालिका आयुक्त कार्यालय,
अधिकार सुपूर्ति क्र.
मआ/एमसी/डीईएल/१४८७
दिनांक : 18 MAR 2015

महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
जावक क्र. मआ/उआ/आस्था/७९८०
दिनांक : 18 MAR 2015

# अधिकार सुपूर्ति आज्ञापत्र

विषय : शिक्षण मंडळ विभागाकडील कामकाजाबाबत.

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ६३ (१५) नुसार प्राथमिक शिक्षणासाठी शाळा चालविणे, त्यांना मदत देणे व त्यांच्यासाठी योग्य जागेची व्यवस्था करणे हे महानगरपालिकेचे बंधनकारक कर्तव्य आहे.

आणि ज्या अर्थी मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) अधिनियम, २०१३ मधील कलम २ (ठ) मध्ये महानगरपालिकेने चालविलेल्या शाळांच्या संबंधातील अधिक्षण, तपासणी व नियंत्रण यांचे अधिकार संबधित महानगरपालिका आयुक्तांकडे व त्याने प्राधिकृत केलेल्या इतर दुय्यम अधिकाऱ्यांकडे असतील अशी तरतूद विहित केली आहे.

आणि ज्या अर्थी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ च्या अनुषंगाने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक ३१/१२/२०१३ रोजीच्या शासन निर्णयातील बाब क्र. ६ मध्ये नमूद केल्यानुसार प्रशासन अधिकारी, शिक्षण, महानगरपालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली काम करतील, असे विहित करण्यात आले आहे.

त्या अर्थी शिक्षण मंडळाकडील कामकाज विकेंद्रीकरणाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या कार्यालयीन आदेश क्र. मआ/साप्र/आस्था/६८५८, दि. ३/३/२०१५ मध्ये नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) अधिनियम, २०१३ मधील कलम २ (ठ) अन्वये महापालिका आयुक्त यांना असलेले अधिकार, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण मंडळ व मुख्य कामगार अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहे.

तरी प्रकरणी सर्व संबंधित खातेप्रमुखांनी याची नोंद घेवून कार्यवाही करावी.

(कुणाल कुमार)
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.

प्रत :
सर्व मा. खातेप्रमुख,
पुणे महानगरपालिका.
यांजकडेस पुढील कार्यवाहीसाठी..